# तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

(ISO 9001:2008 प्रमाणित)

शासकीय तंत्रनिकेतनच्या बाजुला, उस्मानपुरा

पत्र पेटी क्र.- ५१६ औरंगाबाद - ४३१ ००५

(०२४०)२३३४२१६(P) २३३४७६९(O) Fax-२३५६८२०

website : http://www.dteau.org email : roaurangabad@dtemaharashtra.gov.in


परिपत्रक

जा.क्र.विकाऔ/आस्था-३/२०२०/ ६९१

दिनांक :- 27 FEB 2020

विषयः- राज्य शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा लागू करण्याबाबत.

संदर्भ :- १) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्रमांकःसमय१०१९/प्र.क्र.२८/१८ (र.व का) दि.०४.०६.२०१९

२) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांकःसमय१०१६/प्र.क्र.६२/१८ (र.व का) दि.२४.०२.२०२०

३) मा.संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा.मुंबई यांचे पत्र क्र.१६/आस्था/संकीर्ण/२०२०/शा५२२, दि.२७.०२.२०२०

उपरोक्त संदर्भिय क्र. २ च्या शासन निर्णयान्वे या कार्यालयातील सर्व कर्मचा-यांना कळविण्यात येते की, दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० पासून शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात आल्यामुळे सर्व शनिवार व रविवार हे सुट्टीचे दिवस असतील.

या परिपत्रकाद्वारे सर्व कर्मचा-यांना सुचित करण्यात येते की, शासनाने विहित केलेल्या कार्यालयीन वेळेत कार्यालयात उपस्थित असणे बंधनकारक आहे.

१. कार्यालयाची कामकाजाची वेळ ४५ मिनिटांनी वाढविण्यात येत असून ती सोमवार ते शुक्रवार सकाळी.९.४५ ते सायंकाळी ६.१५ अशी राहील.

२. तसेच सर्व कार्यालयातील शिपायांसाठी कामकाजाची वेळ सोमवार ते शुक्रवार सकाळी ९.३० ते सायंकाळी ६.३० अशी राहील.

३. उपरोक्त कार्यालयीन वेळेमध्ये वरील संदर्भिय क्र. १ च्या शासन परिपत्राकानुसार कार्यालयांमध्ये अधिकारी/कर्मचारी वर्गाकरीता कार्यालयीन वेळेत भोजनासाठी दुपारी १.०० ते २.०० या दरम्यान जास्तीत जास्त अर्ध्या तासाची वेळ निश्चित केली आहे.

तरी सर्वांनी शासन निर्णयात नमुद केल्याप्रमाणे कार्यालयीन वेळ पाळली जाईल याची दक्षता घ्यावी. तथापि, संदर्भिय शासन निर्णयामधील परिशिष्ट "अ" मध्ये दर्शविल्यानुसार, शैक्षणिक संस्थांना सदरहु आदेश लागु नाहीत, याची नोंद घ्यावी.

(महेश शिवणकर)
प्र.सहसंचालक,
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, औरंगाबाद

प्रतः १) या विभागाच्या अधिनस्त सर्व शासकीय/अनुदानित/विनाअनुदानीत संस्थांना माहिती देऊन कळविण्यात येते की, दिनांक २९ फेब्रुवारी, २०२० पासून शासकीय कार्यालयांसाठी पाच दिवसांचा आठवडा लागू करण्यात आल्यामुळे हया कार्यालयासाठी सर्व शनिवार व रविवार हे सुट्टीचे दिवस असतील आपल्या माहितीस्तव कळवित आहे.

२) या कार्यालयातील सर्व अधिकारी/कर्मचारी यांना माहितीस्तव.

३) या कार्यालयाच्या प्रोग्रामर यांना माहिती व या कार्यालयाच्या वेबसाईटवर अपलोड करण्यासाठी

Circular /Kakde27022020